


# कुळांनी ग्रासलेल्या, नाडलेल्या समर्थांच्या आगरटाकळी मठाची आर्त हाक

''समर्थांनी तब्बल बारा वर्ष वास्तव्य केलेल्या या स्थानाला त्यांच्या तपोबलामुळं खरं तर अलौकिकत्व लाभलंय... पण, गेल्या काही वर्षांत कोर्ट-कचेऱ्यांच्या फेऱ्यात अडकल्यानं विकासाच्या बाबतीत हेळसांड होत राहिली... त्यातच संस्थानच्या मालकीच्या जमिनी कुळांनी परस्पर विकायला सुरुवात केल्यानं स्थिती काहीशी चिघळली... आता आम्ही लढतोय, कोर्टात... अन् कोर्टाबाहेरही..! हा वारसा टिकवून संस्थानाला उर्जितावस्था आणायची, तर आम्हाला एकाच वेळी व्यवस्थेशी नि ती न मानणाऱ्यांशीही झगडावं लागतंय...'' आगरटाकळीकडून आमची गाडी नाशकात शिरत होती अन् ज्योतीराव खैरनार सांगत असलेली ही हकिकत ऐकून मनात प्रश्नांचं मोहोळ तयार होऊ लागलं होतं. समर्थांचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे ॥ हे परखडपणे विचारणाऱ्या नि त्याचवेळी, उपेक्षुं नको गुणवंता अनंता । रघूनायका मागणें हेचिं आतां ॥ असे आर्तपणे विनवणाऱ्या 'त्या' शब्दांमधले सामर्थ्य सर्वार्थाने श्रेष्ठ नि म्हणूनच सार्वकालिक आहे. पण, इथं मात्र त्या समर्थांच्याच स्थानाकडे वक्रदृष्टीने पाहणाऱ्यांची अन् त्याची उपेक्षा करणाऱ्यांचीही संख्या कमी नसल्याचं विदारक वास्तव समोर येत होतं...



# उपेक्षु नको गुणवंता अनंता...

**नाशिक : विजय बुवा**

नाशिकजवळच्या आगरटाकळी येथे रामदास स्वामींनी सुमारे चारशे वर्षांपूर्वी स्थापन केलेला मठ समर्थ संप्रदायाचा वारसा सांगत उभा आहे. अनेक वर्षांच्या कोर्ट-कचेऱ्या नि संघर्षातून त्याला आता 'श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी मठ' असं नामाभिधान लाभलं आहे. दोनच वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या विश्वस्त मंडळाने मठात विविध उपक्रम सुरू केले. यंदा रामनवमी ते हनुमान जयंतीपर्यंतच्या सप्ताहात व्याख्याने, कीर्तन-प्रवचनांबरोबरच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केलं होतं. अखेरच्या दिवशी समर्थांचे वंशज असलेले न्या. एम. व्ही. गोसावी यांच्या कीर्तनाने या ज्ञानयज्ञाची पूर्णाहुती झाली. यावेळी विश्वस्त ज्योतीराव खैरनार अन् त्यांच्या सहकाऱ्यांनी मलाही आग्रहाने बोलावले नि आवर्जून येण्याचा आग्रह केला. त्याप्रमाणे तिथे गेलो, तेव्हा या स्थानाभोवतीच्या परिसराला आलेली अवकळा मनाला डसू लागली.

विश्वस्त असलेल्या आर्किटेक्ट प्रकाश पवारांना म्हणालो, 'देवस्थानासमोरूनच नासर्डी गटारासारखी वाहतेय, आजूबाजूलाही खूप अस्वच्छता आहे, कुणा लोकप्रतिनिधींचं इकडं लक्ष नाही का..?' त्यावर ते किंचित हसून म्हणाले, 'काय सांगायचं..? विधानसभेत नव्याने गेलेल्या लोकप्रतिनिधीलाही या संस्थानाची पुरेशी माहिती नसेल, तर नदीपात्राची स्वच्छता अन् परिसर विकास या गोष्टी दूरच्याच..!' आणखी विचारल्यावर बरीच धक्कादायक माहिती मिळाली. जिथे जमिनीच्या तुकड्याचा भाव कोटीच्या कोटी उड्डाणे घेतो आहे, त्या नाशकातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या नि कुळांच्या ताब्यात उरलेल्या आपल्या जमिनी सांभाळणं, /...४

पान १ वरून

हेच संस्थानापुढचं मोठं आव्हान बनलं आहे. बरे ही जमीन थोडीथिडकी नाही, तर जवळपास अडीचशे एकर आहे. म्हणजे सध्याच्या बाजारभावाने सुमारे बारा-साडेबाराशे कोटींची..! तिच्यावर बिल्डर आणि आजूबाजूच्या राजकारण्यांची, गल्ली-झोपडपट्टीदादांची वाकडी नजर पडली नसती तरच नवल! त्यामुळे कुळांचे हक्क जोपासत जमिनी सांभाळायच्या नि त्याचवेळी राजकारणी, अधिकारी अशा कुणालाही न दुखावता संस्थानचा विकास करायचा, अशी दोरीवरची कसरत विश्वस्त मंडळाला करावी लागते आहे. एकीकडे समाजकंटकांची वक्रदृष्टी, तर दुसरीकडे राजकीय नेतेमंडळी अन् सर्वसामान्यांचीही उदासीन वृत्ती, अशा कचाट्यात समर्थांची ही तपोभूमी सापडली असल्याचं लक्षात आलं. एवढ्या अलौकिक स्थानाचं मोल आम्हा नाशिककरांना कसं कळलं नाही..? महान वारसा जपत उभ्या असलेल्या अशा ठिकाणांच्या बाबतीत उदासीन राहणारे आम्ही एक तर कृतघ्न असू वा नतद्रष्ट..! असे काहीबाही विचार मनात यायला लागले... परत निघाल्यावरही गाडीत हीच चर्चा सुरू झाली... ज्योतीराव तथा नाना अन् सुधीर शिरवाडकर माहिती देत होते...

.....

आसनगाव येथे मामाच्या मुलीशी लावण्यात येत असलेल्या विवाहाच्या वेदीवर 'साऽवधान..!' हे शब्द कानी पडताच आंतरपाटाआड उभ्या असलेल्या नारायणानं तिथून पलायन केले अन् श्रीराम-हनुमानाच्या आंतरिक ओढीने नाशिक गाठले. हे वर्ष होतं १६२०... गोदावरी-नंदिनीच्या संगमावर टाकळी इथं नारायणानं साधना सुरु केली. गंगागोदावरीत स्नान नि काळारामाचं दर्शन, त्यानंतर तपश्चार्या नि लेखन हीच या रामभक्ताची दिनचर्या बनली. किशोरावस्थेतील नारायणाचं समर्थ रामदास स्वामींपर्यंतचं आत्मिक नि आध्यात्मिक प्रगटीकरण या वास्तव्यात झालं. याच ठिकाणी त्यांनी करुणाष्टके लिहिली अन् संस्कृतमधून संपूर्ण रामायणही लिहिले. याची मूळ प्रत धुळ्यातील वाग्देवता मंदिराने जतन केली आहे. टाकळीमध्येच अनेक कुळांनी संस्थानाला उत्पन्नातील वाटा देणे बंद केले. त्यामुळे मठाच्या व्यवस्थेला अवकळा आली. उत्सव, कार्यक्रम कमी झाल्याने भाविकांनीही पाठ फिरवली. याचदरम्यान १९५४ च्या सुमारास केंद्र सरकारने गांधीनगर प्रेससाठी संस्थानाकडील काही जमीन ताब्यात घेतली. त्यापोटी मिळालेल्या ३४ हजार रुपयांतून नवा मठ बांधण्याचे काम मठाधिपतींने सुरु केले. त्यासाठी जुना, दुमजली मठ पाडण्यात आला. केवळ गाभारा अन् समर्थांनी तपस्या केलेली गुहा तेवढी राहिली. पण, पायऱ्यांच्या कामातच पैसे संपले. त्यामुळे गावातील दोन शेतकऱ्यांनी दावा दाखल करुन हिशेब मागितला. दिनकरबुवांनी न्यायालयाला हिशेबाची हमी दिली, पण पुढे काही झाले नाही. उलट संस्थानची अवस्था दिवसेंदिवस खालावू लागली... शिरवाडकरांच्या तोंडून संस्थानाचा हा इतिहास ऐकताना सतरा-अठराव्या शतकातला उत्कर्षाचा काळ समोर उभा राहात होता अन् त्याचवेळी दिव्य वारसा सांगणाऱ्या अन्य स्थानांप्रमाणेच या ठिकाणचीही अंतर्बाह्य घुसमट सुरु असल्याची भावना अस्वस्थ करत होती...

.....

बालवयात घरातील फडताळात बसून 'चिंता करतो विश्वाची...' असे सांगणाऱ्या नारायणाचा विश्वाच्या कल्याणाचे सूत्र उलगडून दाखवणाऱ्या समर्थ रामदासांच्या रूपात जणू पुनर्जन्म झाला, तो टाकळीतील याच मठात. समाज म्हणून समूहाने राहणाऱ्या मानवला, त्याच्या अवखळ, चपळ मनाला सुदृढ करणारे जीवनव्यवहाराचे दिव्य बोधामृत त्यांना इथेच गवसले. विषय-विकारांच्या आहारी गेलेल्या सामान्य माणसाला न्याय-नीतीने जगण्याचे ज्ञान नि सदाचारातून आत्मोन्नती कशी साधावी, याचे भान समर्थांनी दिले. भक्ती-साधना करतानाच शक्तीच्या उपासनेचा मूलमंत्र त्यांनी दिला अन् याच शिदोरीवर या मऱ्हाटमोळ्या मुलखातील रांगड्या मनांची मशागत झाली. या कसलेल्या मातीतच 'महाराष्ट्र धर्मा'चे बीज अंकुरले, बहरले. तिथं 'स्वराज्या'चा हुंकार घुमू लागला नि शिवरायांच्या अतुलनीय प्रताप अन् असामान्य साक्षेपाने जणू अवघे भूमंडळ अचंबित झाले. ज्यांचे कार्य समाजाच्या जडणघडणीबरोबरच राष्ट्रउभारणीतही खूप मोलाचं ठरलं, ते 'रामदास स्वामी' जिथे घडले, त्या मठाची, तिथल्या परिसराची मात्र आजवरच्या स्थानिक सत्ताधाऱ्यांपासून राज्यकर्त्यांपर्यंत बहुतेक सर्वांनी उपेक्षा केली. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने या संस्थानाचा चांगला विकास होऊ शकतो, पण त्याकडे फारसे कुणी गांभीर्याने पाहिले नाही. दुसरीकडे, कुळांच्या जमिनी परस्पर लाटण्याचे, विकण्याचे उद्योग मात्र सुरू राहिले. त्यात नेहमीप्रमाणे बिल्डर अन् त्यांच्या आडून खिसे भरणारे राजकारणी, अधिकारी यांचा सहभागही लपून राहिला नाही. अशाच काही बेकायदा जमीन विक्रीच्या प्रकरणांचे कोर्टात आजही दावेही सुरु आहेत. तिथे लढता लढता संस्थानाला पुन्हा उभारी देण्याचे, त्याचा विस्तार करण्याचे प्रयत्न विश्वस्त मंडळ करते आहे. दुर्दैवाने राज्य कोणत्याही आघाडी वा युतीचं असलं, तरी लोकप्रतिनिधींचा प्रतिसाद फारसा चांगला नाही. सिंहस्थाच्या आडून स्वतःच्या लाभाची नि दुय्यम महत्वाची अनेक कामे घाईने उरकली जात असताना, त्यासाठी मिळालेल्या निधीतील चार थेंबही समर्थांच्या या स्थानावर पडू नयेत, यासारखी नाशिकच्या कारभाऱ्यांना लाज आणणारी दुसरी गोष्ट नसावी. मोकळ्या जमिनी कुणाच्या का असेना; त्या फक्त बळकावण्यासाठीच असतात, असाच समज असणाऱ्या मुखंडांकडून वेगळी अपेक्षा ती काय करणार? त्यामुळे सर्व आघाड्यांवर एकाकी लढा देणाऱ्या या संस्थानामागे आता समर्थभक्तांनी, नाशिककरांनीच आपलं बळ उभं करावं. समर्थांच्या या संस्थानात त्यांना अभिप्रेत असलेलं ईश्वराचं अधिष्ठान आहेच; आता गरज आहे ती या वारशाचं संगोपन, संवर्धन करणाऱ्या सामर्थ्यवान चळवळीची! टाकळीच्या याच मठात समर्थांनी श्रीरामाची करुणा भाकताना... अनुदिन अनुतापें तापलों रामराया। परमदीनदयाळा नीरसीं मोहमाया।। असे आर्जव केले होते. अंतःक्षोभाने नि बाह्यतापाने त्रस्त झालेल्या त्यांच्या या स्थानालाही लाभ-मोहाच्या मायेतून सोडवण्यासाठी सद्विचारी, सदाचारी लोकांनी पुढे आले पाहिजे. तसे व्हावे म्हणून कदाचित रामदासांची ही तपोभूमीही 'रघूनायका मागणें हेंचि आतां...' असे म्हणत असेल..!

समर्थांनी श्रीरामाचं सुंदर मंदिर बांधलं. शिवाय, त्यांनी स्वहस्ते तयार केलेली गोमय म्हणजे गाईच्या शेणापासून बनलेली हनुमानाची भारतातील एकमेव मूर्ती याठिकाणी आहे. समर्थांनी जिथे तपोसाधना केली, ती छोटी गुहा अन् तिथली रामाची मूर्ती हा तर रामदासी साधकांसाठी अमूल्य ठेवा! रामदासांनी इथे रामनवमी, हनुमानजयंतीसारखे अनेक धार्मिक उत्सव सुरू केले. त्याकाळी अत्यंत रम्य परिसरात असलेल्या या मठात दूरवरच्या भाविकांची मोठी गर्दी व्हायची. १६३२ मध्ये शिष्य उद्धवस्वामी यांना उत्तराधिकारी नेमून त्यांनी मठाची व्यवस्था सोपवली आणि टाकळीतील १२ वर्षांचे वास्तव्य संपवून ते भारतभ्रमणाला निघाले. मठाची महती पुढे वाढत गेली. ती पेशव्यांच्याही कानी गेली. १७५३ मध्ये बाळाजी बाजीराव पेशव्यांनी त्यावेळचे मठाधिपती भीमस्वामी यांना बोलावून संपूर्ण टाकळी गाव मठासाठी बहाल केले. या गावातील जमिनींतून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे मठाची भरभराट झाली. भाविकांचाही राबता वाढला. धार्मिक उत्सवांबरोबरच अन्नदानही मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यातून समर्थांच्या या तपोभूमीची कीर्ती सर्वदूर पसरली... शिरवाडकर सगळा इतिहास तन्मयतेने सांगत होते...

.....

संस्थानच्या या दिव्य वारशाला १९४० नंतर मात्र ग्रहण लागले. मठाधिपती ब्रह्मचारीच असावा, हा दंडक समर्थांनी घालून दिला होता. त्यामुळे तशीच परंपराही निर्माण झाली. पण, आठवे मठाधिपती नारायणस्वामी यांनी ती मोडली. त्यांनी आपला मुलगा दिनकर याला मठाधिपती केले. त्याविरुद्ध टाकळीतील ग्रामस्थांनी न्यायालयात धाव घेतली. ब्रिटिश न्यायालयाने नारायणस्वामींचा निर्णय न बदलता दिनकरस्वामी सज्ञान होईपर्यंत संस्थानच्या सांभाळासाठी पाच पंचांची समिती नेमली. पुढे दिनकरस्वामी सज्ञान झाल्यावर समितीने काम थांबवले. संस्थानाच्या जमिनींवर कब्जेदार म्हणून मठाधिपती अन् कुळांची नावे होती. त्यातूनच मग कुळांकडील जमिनींचे परस्पर व्यवहार करण्यात आले. त्यात त्यावेळचे मठाधिपती अन् काही कुळेही सहभागी होती. दुसरीकडे, जमिनी कसणाऱ्यांपैकी